एल.ए.आर.नं. ३८/२००५
राजकुमार वि. महाराष्ट्र शासन
निशाणी क्र. ६०

अर्जदार तर्फे साक्षीदार क्र.२,

नाव- विजय भाउराव ढाले
वय- ४९ वर्षे,
व्यवसाय- नोकरी/सर्वेअर
राहणार- भुमी अभिलेख, पारशिवनी,

<u>सरतपास अर्जदारातर्फे विद्वान विधीज्ञ श्री. कुशवाह यांच्यातर्फे शपथेवर सुरु-</u>

मी सध्या भुमी अभिलेख, पारशिवनी, येथे कार्यरत आहे. मला न्यायालयाचे समन्स मिळाले होते आणि मी माझ्यासोबत समन्स प्रमाणे कार्यालयातुन मुळे रेकार्ड आणलेले आहे. सर्वे नं.५७/२ हा राजकुमार मधुकर कुशवाह यांच्या नावाने आहे. सदर सर्वे नं. ५७/२ चे क्षेत्रफळ हे २.९३ हे.आर. असे आहे. संपुर्ण जमिन ही संपादित झाली होती. सदर सर्वे नं. ५७/२ मध्ये सत्राची ४०० झाडे होती. सदर माहिती ही मी माझ्यासोबत आणलेल्या भुसंपादन रेकार्ड प्रमाणे सांगत आहे. साक्षीदाराला नि.क्र.६३ दाखविण्यात आली. साक्षीदाराने सांगितले की सदर नि.क्र.६३ मधील माहिती ही ऑफिस रेकार्डप्रमाणे बरोबर आहे. नि.क्र.६३ची प्रमानित प्रत एल.ए.सी.क्र.३८/२००५ मध्ये आहे.

<u>सरतपास पुर्ण.</u>

२. संत्र्याची झाडे हे मी स्वतः मोजली नाहीत परंतु कार्यालयातील कर्मचारी पी.बी.बारापात्रे, परिरक्षण भुमापक यांनी केलेली होती. संत्र्याच्या झाडाची वय अभिलेखामध्ये नमुद नाही. झाडाची खोड किती मोठे होते यांची रुंदी नमुद नाही. प्रस्तुत अभिलेखामध्ये झाडांची वय, त्याची वाढ, त्याचा घेरा इत्यादी बाबी नमुद नाहीत. संत्र्याच्या झाडापासुन उत्पन्न किती होते याचा देखिल तपशिल अभिलेखामध्ये

नमुद नाही. श्री. बारापात्रे हे सध्या कोठे नोकरीमध्ये आहे याची मला माहिती नाही. झाडाच्या मोजणीबाबत, भुसंपादन आफिसकडुन, संयुक्त मोजनी करुन माहिती मागविण्यात आली होती. संयुक्त मोजणी केल्याबाबतची अभिलेखामध्ये नोंद आहे. संयुक्त मोजणीबाबत संबंधीत कार्यालयाच्या अधिका-याची सही आहे, परंतु नाव नमुद नाही. झाडांची मोजणी, दुस-यांदा मोजणी करण्यासाठी गेले होते, त्यावेळेस केली आणि तसा उल्लेख अभिलेखामध्ये आहे. अभिलेखावर एम.एस.ई.बी. यांच्या कर्मचा-यांची सही नाही. पहिल्या मोजणीच्या वेळेस झाडाची संख्या ही निरंक होती. दुस-या मोजणीच्या वेळेस झाडाची संख्या कशी वाढली याचा उल्लेख अभिलेखामध्ये नाही. पहिली आणि दुसरी मोजणी ही बारापात्रे यांनीच केली होती. हे म्हणणे खरे आहे की झाडाची संत्र्या पहिल्या मोजणीच्या वेळेस बरोबर लिहिली की दुस-या मोजणीच्या वेळेस बरोबर नमुद करण्यात आली होती, हे मी सांगु शकत नाही. दुस-या मोजणीच्या वेळेस अर्ज कोणी केला होता याचा उल्लेख अभिलेखामध्ये नाही परंतु अर्ज रेकार्डमध्ये आहे. हे मी सांगु शकत नाही की दुस-या मोजणीच्या वेळेस शेती मालकाच्या संगणमताने संत्र्याच्या झाडांची संख्या ही वाढविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की संख्या का वाढविण्यात आली याचा खुलासा केवळ श्री. बारापात्रेच करु शकतो. मोजणीमध्ये झाडे नमुद करतांना खाडाखोड करण्यात आलेली आहे आणि त्याबाजुला काउंटर सही नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की सही ही समोर आहे. सही कोणाची आहे हे मी सांगु शकत नाही. ज्या ठिकाणी चुक झालेले आहे त्या ठिकाणी काउंटर सही करण्यात आलेली आहे. परंतु झाडाची संख्या नमुद करतांना काउंटर सही नाही. हे मी सांगु शकत नाही की दुस-या मोजणीच्या वेळेस एम.एस.इ.बी. अधिकारी उपस्थित नसतांना चुकीची नमुद करण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की संत्र्याची झाडे कधी लावण्यात आली होती, त्याची कलमे कुठुन घेण्यात आली होती याचा उल्लेख अभिलेखामध्ये नाही.

उलटतपास इतर गैरअर्जदारांकरीता, -

इतर गैरअर्जदार गैरहजर सबब,उलटतपास नाही.

उलटतपास पुर्ण
फेरतपासनाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.05.11 16:40:51 +0530

दिनांक ११/०५/२०२६
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. Khobragade (Gr.-II)